## आय.डी.ई.एम.आय., मुंबई येथे डी डी यू–जी के वाय योजने अंतर्गत उपलब्ध सुविधा


१. संपुर्ण प्रशिक्षण विनामुल्य
२. निवासाची व्यवस्था विनामुल्य
३. नाष्टा, चहा, भोजन विनामुल्य
४. उत्तम व अनुभवी प्रशिक्षक
५. आधुनिक तांत्रिक ज्ञान
६. आधुनिक मशीनरी, सॉफ्टवेअर
७. भरपूर प्रात्याक्षिके व सराव
८. उद्योजकीय गुणवत्ता प्रशिक्षण



## प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना खालील उद्योगामध्ये/कारखान्यामध्ये आय.डी.ई.एम.आय., मुंबई या संस्थेने रोजगार मिळवून दिलेल्या काही कंपन्यांची नावे

१) देवू टूल्स प्रा. लि., ठाणे
२) सिलेक कंट्रोल प्रा.लि., नवी मुंबई
३) डेमो कास्टर्स प्रा.लि., मुंबई
४) कॉस्मो इलेक्ट्रो इंडस्ट्रीज प्रा.लि., मुंबई
५) पावरविव स्टुडीओ, ठाणे
६) ॲडनेट ग्लोबल, मुंबई
७) प्राईम फोकस, मुंबई
८) ट्रेस विएफएक्स, मुंबई
९) सुयश इम्पेक्स प्रा.लि. नवी मुंबई
१०) गोदरेज, मुंबई
११) पंटको प्रिसिजन प्रा.लि. नाशिक
१२) इनोव्हीजन, आयआयटी, मुंबई

## वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई येथे पोहोचण्याचा मार्ग




वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई
भारत सरकारची संस्था
(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय)
ईस्टर्न एक्सप्रेस हाइवे, एव्हराई नगर बस स्टॉपच्या बाजूला, चूनाभट्टी, मुंबई – ४०००२२
फोन (०२२) २४०५०३०१/२/३/४, फॅक्स : (०२२) २४०५००१६
इमेल: training@idemi.org वेबसाईट: www.idemi.org

IDEMI

संपर्क: प्रशिक्षण विभाग
९८६९०८७६१७ / ९४०५०४०५२४ / ९८३३२९२६७० / ९८१९४९५५४७

# भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनातर्फे दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजने अंतर्गत सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी

(ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर या जिल्ह्यांकरिता)

## प्रस्तावना

ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंतर्गत भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशनची (एन. आर. एल. एम.) सुरुवात केली आहे. ग्रामीण गरिबांसाठी कार्यक्षम, प्रभावी व संस्थात्मक व्यासपीठ तयार करण्याच्या हेतूने, त्यांना टिकाऊ उपजीविका वाढीद्वारे, आर्थिक आणि सार्वजनिक सेवांमध्ये सुधारीत प्रशिक्षणाद्वारे त्यांचे घरगुती उत्पन्न वाढवण्यास सक्षमक करणे, ग्रामीण गरीब आणि सुशिक्षित लोकांना, स्वयंव्यवस्थापक व संघटीत संस्थांना एकत्रीत करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनातील समृद्धीसाठी त्यांची मदत करणे हा उद्देश आहे. या उद्दीष्टांच्या पुढे महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका मिशन (एम.एस.आर.एल.एम.) स्थापन करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील गरीब आणि दुर्लक्षित ग्रामस्थांसाठी रोजगार/स्वयंरोजगार निर्माण करून महत्वाच्या कामासाठी प्रयत्न करणे तसेच या गरिबांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांचे हक्क, न्याय, सार्वजनिक आणि सामाजिक सेवा त्यांना पोहचवणे हा अभियानाचा महत्वाचा भाग आहे.

## योजनेचा मुख्य उद्देश्य

"तळागाळातील गरिबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची/ स्वयंरोजगाराची संधी मिळवणे गरीब कुटुंबांना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्र्य कमी करणे, परिणामी कायम स्वरूपी तत्वावर त्यांच्या उपजीविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे".

१) ग्रामीण भागातील अल्पउत्पन्न गटातील बेरोजगार तरुणांना निवडून प्रशिक्षण देणे व स्वयंरोजगार उभारणीसाठी मार्गदर्शन करणे.
२) ग्रामीण भागाच्या विकासासाठी तरुणांना प्रशिक्षण देणे.
३) ग्रामीण भागात उद्योग व्यवसाय विकसीत करण्यासाठी प्रयत्न करणे.
४) ग्रामीण भागातील विकासाला चालना देणाऱ्या संस्था प्रतिनिधींना प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे.
५) ग्रामीण भागात स्वयंसहायता गट वाढीसाठी मार्गदर्शन करणे

## काय आहे दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU - GKY)?

'खेड्याचा विकास म्हणजे देशाचा विकास'

ग्राम विकासाचे महात्मा गांधीचे स्वप्न मुर्त स्वरुपात साकारायचे असेल तर ग्रामीण भागात उद्योग व्यवसायाला चालना देण्याची गरज आहे. यासाठी तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देणे हा एक महत्वाचा घटक आहे. म्हणुनच या ठिकाणी दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य ही भारत सरकार व महाराष्ट्र सरकारची ग्रामीण कौशल्य योजना असून, ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील युवा युवतींना किमान कौशल्य प्राप्त करण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या किमान वेतनापेक्षा जास्त वेतनाचा रोजगार उपलब्ध करून ग्रामीण भागातील युवा युवतींचा राहणीमानाचा स्तर उंचविण्याचे कार्य करणारी एक योजना असून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये या योजनेचा ग्रामीण युवा युवतींना लाभ मिळणार आहे.

# वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई

भारत सरकारची संस्था

(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय)

IDEMI

## प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेची संक्षिप्त माहिती – आय.डी.ई.एम.आय.

आय.डी.ई.एम.आय., मुंबई हि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयाअंतर्गत भारत सरकारची संस्था असून टूल अँड डाय मेकिंग क्षेत्रात आरेखन व उत्पादन करणे आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवून उद्योग क्षेत्रात प्रगत मनुष्यबळ विकसित करणे हा उद्देश साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात मुंबई येथे स्थापन करण्यात आलेली केंद्र सरकारची संस्था आहे.

संस्थेचा मुख्य उद्देश असा आहे की देशातील टूलिंग तंत्रज्ञान, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, ॲनिमेशन, ऑटोमोटिव्ह उद्योग व सबंधित उद्योगांना तांत्रिक सहाय्य पुरविणे व या क्षेत्रात कुशल मनूष्यबळाचा विकास करणे, याचबरोबर तंत्रज्ञानातील शैक्षणिक संस्थांना व त्यांच्या प्रशिक्षकांनाही प्रत्यक्ष. अप्रत्यक्ष तंत्रज्ञानात मदत करणे, तसेच देशातील युवक युवतींना व्यावसायाभिमुख प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण देऊन उद्योजक तथा रोजगार निर्मिती करण्याची संधी उपलब्ध करून देणे व देशाच्या विकासाला हातभार लावणे. त्याच बरोबर औद्योगिक क्षेत्रात लागणारे कुशल मनुष्यबळ विकसित करणे व अद्यावत प्रशिक्षणाद्वारे नवनवीन तंत्रज्ञान प्रशिक्षणार्थ्यांना देणे. औद्योगिक क्षेत्रात लागणारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे, विकासात्मक तंत्राचा वापर अभियांत्रिकीत करणे इ.

आय.डी.ई.एम.आय., मुंबई भारतातील व परदेशातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी विविध कौशल्य विकास कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवीत असून आय.डी.ई.एम.आय. मधून प्रशिक्षित झालेल्या उमेदवारास भारतातच नव्हे तर परदेशातील उद्योगात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत तसेच अनेक उमेदवारांनी स्वत:चा व्यवसाय उभारलेला असून आज हेच उमेदवार यशस्वी उद्योजक म्हणून दमदार वाटचाल करत आहेत व देशाचा औद्योगिक पाया मजबूत करण्यासाठी मदत करीत आहेत. आय.डी.ई.एम.आय., मुंबई ही एक अग्रणीय कुशल मनुष्यबळ निर्मिती आणि टुलिंग क्षेत्रात काम करणारी राष्ट्रीय संस्था असून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय अंतर्गत भारत सरकार द्वारा नवनवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने औद्योगिक क्षेत्रात लागणाऱ्या टूलिंग्सची निर्मिती करण्याचे व उच्च प्रशिक्षण देण्याचे कार्य सातत्याने करीत आहे. या संस्थेत अत्याधुनिक मशिनद्वारे वेगवेगळ्या प्रक्रिया करून टूलिंग्सची निर्मिती, परीक्षण, दर्जा पडताळून पाहणे या सर्व बाबी एकाच ठिकाणी प्रत्यक्ष केल्या तर जातातच त्याचबरोबर प्रशिक्षणार्थ्यांना शिकविल्याही जातात. यासाठी आवश्यक सुविधा जसे प्रशस्त वर्गखोल्या, सभागृह, भरपूर पुस्तकासह ग्रंथालय तसेच व्हिडिओज, मासिके संशोधनात्मक पत्रिका इ. बाबींनी परिपूर्ण आहे. टूलिंगसच्या डिझाईन व उत्पादन क्षेत्रात लागणारी पुस्तके, तंत्रज्ञान विषयक अद्यावत माहिती ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. सदर संस्था मुंबई शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून या संस्थेच्या परिसरात मुला मुलींसाठी स्वतंत्र्य वसतिगृह व भोजनालयाची व्यवस्था आहे. येथील संपूर्ण परिसर सर्व दृष्टीने सुरक्षित असून येथील वातावरण शिक्षणास पोषक आहे.

आय.डी.ई.एम.आय., मुंबई ही संस्था दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेअंतर्गत विविध तांत्रिक कोर्सेसद्वारे प्रशिक्षण देण्याचे कार्य करणार असून प्रशिक्षणा उपरांत लाभार्थ्यांना महाराष्ट्रासह इतर राज्यात विविध शहरातील कारखान्यामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार आहे. लाभार्थी आपल्या कौशल्याचे चुणूक दाखवत प्रामाणिकपणे चिकाटीने कार्य करून आपला स्वत:चा व त्याच बरोबर आपल्या देशाचाही उत्कर्ष साधतील अशी अपेक्षा आहे.

## आय.डी.ई.एम.आय., मुंबई येथे डी.डी.यू.जी.के.वाय. योजनेअंतर्गत उपलब्ध एन.एस.क्यू.एफ. प्रमाणित कार्यक्रम

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे (कोर्सचे) नाव | कालावधी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | ॲडवान्स डिप्लोमा इन सीएनसी प्रोग्रामिंग टेक्निक अँडप्रॅक्टिस | ७ महिने | दहावी पास |
| २. | सर्टिफिकेट कोर्स इन मशिन ऑपरेशन | १२ महिने | आठवी पास |
| ३. | ॲडवान्स सर्टिफिकेट कोर्स इन टूल डिझाईन अँड कॅड कॅम | १२ महिने | आय.टी.आय. पास |
| ४. | ॲडवान्स डिप्लोमा इन कॉम्पुटर हार्डवेअर अँड नेटवर्क मॅनेजमेंट | ६ महिने | डिप्लोमा / डिग्री इंजिनिअरींग पास |
| ५. | ३डी ॲनिमेशन (माया) | ६ महिने | |
| ६. | ॲडवान्स वेब डीझाईनर अँड ॲनिमेटर | ६ महिने | |
| ७. | ऑडिओ विडीओ | ४ महिने | बारावी पास |
| ८. | हँड हेल्ड प्रोडक्ट | ४ महिने | |
| ९. | रूम एअरकंडीशनर अँड होम अप्लायन्सेस | ५ महिने | |
| १०. | ॲडवान्स सर्टिफिकेट कोर्स इन टूल अँड डाय मॅन्युफॅक्चरींग | १२ महिने | आय.टी.आय. पास |
| ११. | सर्टिफिकेट कोर्स इन सीएनसी टर्निंग अँड मिलिंग | १२ महिने | |
| १२. | सर्टिफिकेट कोर्स इन पीसीबी डीझाईन अँड मॅन्युफॅक्चरींग | १२ महिने | बारावी पास |
| १३. | सर्टिफिकेट कोर्स इन इलेक्टॉनिक्स इक्युपमेंट टेक्नीशियन | १२ महिने | |

**टीप:** वरील प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात प्रशिक्षण कालावधी, प्रवेश क्षमता शैक्षणिक पात्रता इ. बाबतचे सर्व हक्क/अधिकार सदर संस्थेकडे राखीव असतील.

## प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक पात्रता

१. प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रराज्यातील ग्रामीण भागातील रहिवाशी असावा.

२. प्रशिक्षणार्थ्याचे नाव दारिद्र्य रेषेच्या यादीत समाविष्ट असणे बंधनकारक आहे.

३. वय १८ ते ३५ असावे

## आवश्यक प्रमाणपत्र

१. शाळा सोडल्याचा दाखला

२. आठवी/दहावी/बारावी/आय.टी.आय./डिप्लोमा चे गुणपत्रक व प्रमाणपत्र (प्रशिक्षणाच्या पात्रतेप्रमाणे)

३. दारिद्र्य रेषेखालील नोंद असल्याचा पुरावा/ बिपीएल कार्ड/ मनरेगा जॉब कार्ड/आर.एस.बी.वाय. कार्ड / अंत्योदय अन्न योजना रेशन कार्ड/स्वयं सहायता गट

४. रहिवाशी दाखला

५. जातीचे प्रमाणपत्र

६. पासपोर्ट साइज फोटो

७. आधार कार्ड